संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ईव्हीएम मशीनबरोबर आयोगाच्या विश्वासार्हतेचा प्रश्न

**देशभरात** लोकसभा निवडणुकीचा निम्म्यापेक्षा जास्त हंगाम संपुष्टात आला आहे. आणि एकूण मतदानाची टक्केवारी शिवाय मतदान केंद्रांवरील एकूण परिस्थिती पाहिल्यानंतर जवळपास २१ वेगवेगळ्या राजकीय पक्षांना ईव्हीएम मशीन्स म्हणजेच मतदान यंत्रांबाबत बरेच अनुभव आलेले दिसतात आणि या २१ वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी एकत्र येऊन मतदान यंत्राविषयीची तक्रार थेट आता सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. जवळपास २१ प्रमुख राजकीय पक्षांना ईव्हीएम मशीनविषयी तक्रार असावी ही काही साधारण गोष्ट ठरत नाही. निवडणूक आयोगाकडे यासंदर्भात तक्रारी केल्या परंतु निवडणूक आयोगाने केलेल्या खुलाशावर त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून ही ईव्हीएम मशीन वापरत असताना त्यातून दिले गेलेले मत कोणाला मिळाले हे तपासता आले पाहिजे. तसेच कोणतेही बटण दाबल्यानंतर मग भाजपाला जात असल्याची गंभीर तक्रारही या राजकीय पक्षांनी केलेली आहे. आता सर्वोच्च न्यायालय यासंदर्भात काय भूमिका घेते हे यथावकाश कळेलच. परंतु यानिमित्ताने एकूणच लोकशाहीमधल्या निवडणूक प्रक्रियेविषयीच काही गंभीर प्रश्न उपस्थित होतात. किंबहुना ईव्हीएम मशीनसविषयी वारंवार तक्रारी होत असल्यामुळे निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह उभे राहाते. चार-पाच राजकीय पक्षांनी तक्रारी केल्या असत्या. तर त्याचे एवढे महत्त्व वाटू शकले नसते किंवा आतापर्यंत वेगवेगळ्या स्तरावर अनेक राजकीय पक्षांनी ईव्हीएम मशीन म्हणजेच मतदान यंत्राविषयी तक्रारी केल्याही असतील. निवडणूक आयोगाने त्या त्या राजकीय पक्षांच्या नेत्यांना व्यक्तिगतरित्या बोलावून त्यांचेही शंकासमाधान करण्याचा प्रयत्न केलाही असेल. त्यानंतरही देशभरातल्या वेगवेगळ्या ठिकाणच्या मतदान केंद्रांवर या यंत्राविषयी प्रत्यक्ष अनुभव येत असतील किंवा मतदान यंत्रातील तथाकथित बिघाडाचे कारण देऊन काही वेगळा प्रकार तर घडत नसावा ना अशीदेखील शंका यानिमित्ताने व्यक्त झालेली दिसून येते. रिमोट पध्दतीने मतांची हेराफेरी करण्याचे तंत्र वापरले जात असल्याचा संशयच या राजकीय पक्षांनी व्यक्त केलेला आहे. आजकालचे माहिती तंत्रज्ञान इतके विकसित झाले आहे की अनेक गोष्टी या तंत्रज्ञानाच्या वापरातून घडवून आणता येतात. अशावेळी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन मॅनिप्युलेट करता येणे म्हणजे त्या तंत्राचा आपल्या पध्दतीने वापर करण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.

### एकवीस पक्ष एकत्र

खरे सांगायचे तर २०१४ च्या निवडणुका झाल्यानंतरही सर्वप्रथम उत्तर प्रदेशात मायावतींनी यासंदर्भात अतिशय जोरदार तक्रार केली होती. उत्तर प्रदेशातली राजकीय समीकरणे ज्यांना अगदी तोंडपाठ आहेत. तेव्हा आपण केलेल्या प्रचारातून जनतेचा कौल काय आहे हे ओळखण्याची ज्या राजकीय नेत्यांना विशेष जाण आहे त्यामध्ये मायावतींचाही समावेश होतो. त्यावेळी अत्यंत अनपेक्षित निकाल लागल्यामुळे यामध्ये ईव्हीएम मशीन्सचाच घोटाळा असल्याचा त्यांनी त्याचवेळी आरोप केला होता. देशातल्या अनेक मतदारसंघांमध्ये स्थानिक स्तरावर वेगवेगळ्या तक्रारी होत राहिल्या. परंतु हे सगळे प्रकार विस्कळीत असल्यामुळे त्या त्या तक्रारींचे तिथेच समाधान करण्याचा प्रयत्न निवडणूक अधिकाऱ्यांनी केला. त्यानंतर दिल्लीतल्या आम आदमी पार्टीने पुराव्यासकट त्या ईव्हीएम मशीन्सचा घोटाळा निवडणूक आयोगाच्या लक्षातही आणून दिला. परंतु निवडणूक आयोगाच्या कस्टडीत असलेल्या मशीनचे प्रात्यक्षिक केल्यानंतर तसे काहीच आढळून न आल्याने ती तक्रार तशीच राहिली. यावेळी तर लोकसभा निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वीच सर्व विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाची भेटही घेतली. न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. याची दखल घेऊन निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदारसंघातल्या पन्नास टक्के मतपत्रिका प्रत्यक्ष कागदावर पुरावा म्हणून सादर करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले. त्यामुळे नेमके कोणाला मतदान झाले हे पाहाण्याची संधी यावेळी उपलब्ध होऊ शकणार आहे, अर्थात ही सोय केल्यानंतरही ईव्हीएम मशीन्सच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी कायम राहिलेल्या दिसून येतात. या सगळ्या व्यवस्थेसाठी वीस ते पंचवीस हजार कोटींचा खर्च केला जातो. तरीदेखील अशा प्रकारची शंका किंवा संशय राहात असेल तर ते आणखीनच गंभीर स्वरूपाचे ठरते. त्यातल्या त्यात राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाकडे तक्रारी करून वेळ घालवण्यापेक्षा थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा जो निर्णय घेतला तो अधिक योग्य म्हणावा लागेल.

### विश्वासार्हता महत्त्वाची

पूर्वी मतपत्रिकांच्या माध्यमातून मतदान व्हायचे. मतपत्रिकेवर मारलेला शिक्का हा पुरावा म्हणून स्वीकारला जात होता. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये असे पुरावे मागायची संधीच उपलब्ध होत नव्हती. आता झालेल्या मतदानाची प्रिंट किंवा छापलेली प्रत मिळू शकेल अशी व्यवस्था या मतदान यंत्रांमध्ये करण्यात आलेली आहे. तो पुरावा उपलब्ध होत असतानाच प्रत्यक्ष त्यात वापरले गेलेले सॉफ्टवेअर विश्वासार्ह नसल्याचे या विरोधी पक्षांचे म्हणणे आहे कारण कोणतेही बटण दाबले तरी मत एका विशिष्ट पक्षाच्या खात्यात जाते. असा आरोप करणे ही काही साधारण गोष्ट ठरत नाही. आणि मग याबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे निवडणूक आयोगाकडूनच जाणून घ्यावे लागेल. लोकसभा निवडणुकीचा उर्वरित टप्पा पूर्ण होत असताना ईव्हीएम मशीन्सची विश्वासार्हता जर तपासली गेली तर ती अधिक संयुक्तिकही ठरू शकते. निवडणुका झाल्यानंतर मशीनच्या विरोधात तक्रारी करणे योग्य ठरले नसते. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयानेसुध्दा या तक्रारींची तातडीने आणि गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. कारण या मशीनविषयी निर्माण झालेला संशय केवळ मशीनपुरता मर्यादित राहात नाही तर या मशीनची व्यवस्था करणाऱ्या निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेविषयी भले मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होते. तंत्रज्ञानाचा वापर करत असताना त्यातही पारदर्शकता किंवा विश्वासार्हता खूप महत्त्वाची असते. हे लक्षात घेतले पाहिजे.